पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम ता.जि.वाशिम
कार्यालय दुरध्वनी क्र. ०७२५२–२३४८३४
ई–मेल sp.washim@mahapolice.gov.in
Website:-www.washimpolice.gov.in

## प्रेस नोट

दिनांक :– १५/०२/२२

### वाशिम जिल्हयातील पोलीस अंमलदार यांची क्रिडा क्षेत्रात तसेच वार्षिक गोळीबार सरावात मोलाची कामगिरी.

मा. पोलीस अधिक्षक बच्चन सिंह नेहमीच पोलीस अधिकारी/अंमलदार यांना त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबाबत कौतुकाची थाप देऊन सन्मानित करुन त्यांचे मनोबल वाढविण्याचा प्रयत्न करीत असतात.

दिनांक २४/१२/२१ ते २६/१२/२१ या कालावधीत विदर्भ पॉवर लिफ्टिंग असोसिएशन नागपुर यांनी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय पॉवर लिफ्टिंग प्रकारात वाशिम जिल्हयात कार्यरत महिला पोलीस अंमलदार संगिता ढोले बक्र.१२०० आणि निलोफर बी शेख नसीर बक्र.१४१६ यांनी सहभाग नोंदविला त्यात संगिता ढोले यांनी ८७ वेट कॅटगरी मध्ये एकुण २० खेळाडुपैकी १६५ स्कॅटो टोलन पार करुन प्रथम क्रमांक प्राप्त करुन सुवर्ण पदक पटकाविले तर निलोफर शेख यांनी ८४ वेट कॅटगरी मध्ये एकुण ०५ खेळाडुमध्ये १९५ स्कॅटो टोलन पार करुन द्वितीय क्रमांक प्राप्त करुन रौप्य पदक पटकाविले. पोलीस नाईक आशिष जयस्वाल बक्र.९३१ पोलीस मुख्यालय वाशिम यांनी दोन्ही खेळाडुंना उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

तसेच दरवर्षी प्रमाणे घेण्यात येणाऱ्या वार्षिक गोळीबार सराव देखील पोलीस अंमलदार यांनी आपले कौशल्य पणाला लावले. दिनांक ०७/०२/२०२२ ते १३/०२/२०२२ या कालावधीत वार्षिक गोळीबार सरावाकरीता एकुण ४९ अधिकारी ६५३ अंमलदार असे एकुण ७०२ जवानांनी यांनी सहभाग नोंदविला त्यापैकी वार्षिक गोळीबार सरावामध्ये पुरुष गटात ७.६२ एम.एम.एस.एल.आर ग्रुप/ॲप्लीकेशन फायर मध्ये पोस्टे रिसोड येथे कार्यरत पोशि १४३० अशोक कोटुळे यांनी प्रथम तर पोलीस मुख्यालय वाशिम येथे कार्यरत डिआय पोशि १२९१/ अमीर खान यांनी द्वितीय तर पोस्टे मंगरुळपीर येथे कार्यरत पोशि १५५/चंदन राठोड यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. तर वाशिम जिल्हा पोलीस दलातील महिला ही मागे नसुन ७.६२ एम.एम.एस.एल.आर महिला गटात डि.आय.मपोशि १२४२ वर्षा चव्हाण,डि.आय मपोशि १४८१/विश्वती पखाले, मपोशि १४८२ शर्विनी पखाले यांनी तृतीय क्रमांक पटकावुन बेस्ट फायरर म्हणुन सन्मानित करण्यात आले. अदयाप ही वार्षिक गोळीबार सराव सुरु असुन उर्वरित जवानांमधील जे बेस्ट फायरर असतील त्यांना ही सन्मानित करण्यात येईल.

या कामगिरी बद्दल सर्वांचे मा. बच्चन सिंग पोलीस अधीक्षक वाशिम, मा. गोरख भामरे अपर पोलीस अधीक्षक वाशिम, राखीव पोलीस निरीक्षक पो.मु. वाशिम मांगीलाल पवार,सहा.प्रशिक्षक पोलीस क्रिडा प्रशिक्षक आशिष जयस्वाल तसेच खेळाडुंचा सत्कार करून भविष्यात उज्ज्वल कामगिरी करीता शुभेच्छा दिल्या.

मा. पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंह यांनी वाशिम जिल्हा पोलीस दलाने भविष्यात सुध्दा अशाच प्रकारची भरीव कामगिरी करुन वाशिम जिल्हा पोलीस दलाचे नाव उंचाविण्याकरीता प्रोत्साहन दिले आहे.

पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा वाशिम